निर्भय बनो

# ''महाराष्ट्र राज्यामध्ये ज्वारी, बाजरी, मका या सारख्या धान्यापासून फक्त राजकीय स्वार्थापोटी दारू निर्मितीचे कारखाने काढण्याच्या शासनाच्या निर्णयाचा निषेध करण्यासाठी राज्यामध्ये दि.१६ मार्च २०१० पासून जन आंदोलन''



## लाखोंच्या संख्येने सामील व्हा!

दारू ही माणसांच्या जीवनात हानी पोहचविणारी बाब आहे, हे शासनाने परिपत्रक काढून मान्य केलेले आहे, युवाशक्ती ही आमची राष्ट्रशक्ती आहे. युवा शक्तीच या राष्ट्राचे नव निर्माण करू शकेल असा विश्वास वाटतो. मात्र अशी युवाशक्ती दारू आणि इतर मादक पदार्थांच्या आहारी जात असलेने समाज व देशाची फार मोठी हानी होत आहे.

दारू सारख्या व्यसनामुळे खेड्यापाड्यातील कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात येत चालली आहे, दिवसें दिवस खेड्या पाड्यातील महिलांना दारूमुळे रस्त्यावरून वागणं मुश्कील झालेलं आहे. शाळेतील अल्पवयीन विद्यार्थ्यांनाही दारू व्यसनाची लागण झालेली आहे. ही हानी पैशांनी भरून न निघणारी हानी आहे. सरकार दारू उत्पन्नातून मिळणाऱ्या चार (४०००) हजार कोटी रूपये उत्पन्नाचा विचार करीत आहे.

मात्र युवाशक्तीच्या होणाऱ्या हानीची कोट्यावधी रूपये मोजूनही किंमत करता येणार नाही. याचा विचार शासन करीत नाही. आज राज्यात अनेक ज्वलंत प्रश्न उभे आहेत, महागाईचा भस्मासुर वाढत चालल्याने सामान्य माणसांना आपलं जीवन जगणं अशक्य झाले आहे. दिवसें दिवस खेड्या-पाड्यातील पिण्याच्या पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. काही शहरांनी अपुऱ्या पाणी साठ्यामुळे पाण्याची कपात केलेली आहे. निसर्ग आणि मानवतेचे शोषण होऊन पर्यावरणीय धोके निर्माण झालेले आहेत. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शास्त्रशुध्द पध्दतीने प्रत्येक खेड्यात जलसंधारणाचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे, मात्र त्या प्रश्नावर राज्यकर्ते बोलत नाहीत.

आज अनेक खेड्यातील पिण्याचे पाणी संपत चालले आहे. एक दिवस पेट्रोल संपणार आहे, डिझेल संपणार आहे, कोळसा संपणार आहे, रॉकेल संपणार आहे, काय होणार येणाऱ्या भावी पिढ्यांचं? धरणे मातीच्या गाळाने भरत चालली आहेत, कधी तरी धरणे मातीच्या गाळाने पूर्ण भरणार आहेत, तो गाळ कोणालाही काढता येणार नाही. अशा वेळी धरणांच्या आधाराने चाललेल्या साखर कारखान्यांचे काय होणार, मोठ्या शहरांना मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे काय होणार, वीज निर्मिती प्रकल्पांचे काय होणार, एमआयडीसी कारखान्यांचे काय होणार या सारखे अनेक ज्चलंत प्रश्न उभे असताना त्या प्रश्नांवर सरकार गांभीर्याने विचार न करता काही मंत्री वाईनचा विचार करत आहेत तर काही जण मोहांच्या फुलापासून दारूचा विचार करीत आहेत. तर काही ज्वारी, बाजरी, मका सारख्या अन्न धान्यापासून दारू निर्मितीचा विचार करीत आहेत ही बाब राज्याच्या दृष्टीने दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. खेड्यांचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय देशाचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. मात्र खेड्यांच्या सर्वांगीण विकासावर राज्यकर्ते बोलत नाहीत आणि काही जण बोलले तरी ३१ मार्चचा विचार करून बोलतात. सामाजिक परिवर्तनाचा विचार होत नाही.

विशेषत: सरकारमधील काही माणसं ज्वारी, बाजरी, मकापासून निर्माण होणाऱ्या दारूच्या कारखान्यांमुळे शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळेल असा फसवा प्रचार करीत आहेत. शेतकऱ्यांची एवढी चिंता आहे तर स्वातंत्र्याच्या ६२ वर्षांत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या का रोखता येत नाहीत? **''माल खाये मदारी और नाच करे बंदर''** अशी शेतकऱ्यांची अवस्था आहे, दलाल लोकांनी शेतकऱ्यांच्या मालाच्या नफ्यावर लाखो रुपये कमवून बसले आहेत. मात्र शेतकऱ्यांची झोपडी बदलत नाही हे सरकारमधील लोकांना दिसत नसेल असं म्हणता येत नाही त्याची चिंता कोणी करीत नाहीत. शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था बदलू शकते हे अनेक खेड्यातील ग्रामस्थांनी दाखवून दिले आहे. मात्र त्याचे अनुकरण व्हावे असा प्रयत्न होत नाही.

कंपनीमध्ये उत्पन्न होणाऱ्या वस्तूची किंमत जर कंपनीचा मालक ठरवतो तर शेतकऱ्यांच्या वस्तूंची किंमत ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना का नको? किमान खर्चावर आधारित भाव त्याला का देऊ नये? या संबंधाने सरकार गंभीर होऊन विचार करीत नाही. मात्र दारूच्या कारखान्यांमुळे शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव मिळेल असा फसवा प्रचार होत आहे, ही कृषी प्रधान देश म्हणविणाऱ्या या देशामध्ये दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. शेतकऱ्यांच्या हितासाठीच ज्वारी, बाजरी, मका या धान्यापासून दारू बनविण्याचे कारखाने काढले आहेत, असं काही जणांचं म्हणणं असेल तर हे सर्व कारखाने राजकीय क्षेत्रातील लोकांनाच देण्यात येण्याचे कारण काय? औद्योगिक क्षेत्रात काम करणारी इतर माणसं जी राजकारण विरहित चांगलं कार्य करतात अशा माणसांचा का विचार झाला नाही? कारण ज्या राजकारणी लोकांना हे कारखाने देण्यात आले, **त्या प्रत्येक कारखान्याची प्रत्येक दिवसाची उत्पादन क्षमता ६० हजार लिटर पासून १२० हजार लिटर पर्यंत आहे. प्रत्येक लिटरला १० रूपये सबसिडी दिली तरी दर दिवशी या प्रत्येक कारखान्याला ६ लक्ष रुपयांपासून १२ लक्ष रुपयांपर्यंत सबसिडी दिली जाणार आहे.**

त्याचप्रमाणे कारखाने उभारणीसाठी जो खर्च येणार आहे तो एम.आय.डी.सी. च्या क्रमवारी (ग्रेड)प्रमाणे सबसिडी दिली जाणार आहे. काही ठिकाणी १००% ते १००% खर्च दिला जाणार असलेचे समजते. सबसिडीचा दिला जाणारा सर्व पैसा हा जनतेचा पैसा असलेने सरकारने असा निर्णय घेताना जनतेला विश्वासात घेऊन निर्णय घ्यायला हवा होता. जनता या देशाची मालक आहे. सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी जनतेचे सेवक आहेत. सरकारी तिजोरीतील पैसा हा जनतेचा असल्याने तो खर्च करताना जनतेला विश्वासात घेवूनच खर्च करायला हवा. कारण लोकशाही आहे. गोपनीय पध्दतीने जनतेचा पैसा खर्च होत असेल तर इंग्रजांच्या हुकुमशाही राज्यामध्ये व आजच्या राज्यामध्ये फरक काय? पण या प्रकल्पासंबंधाने जनतेला माहीत न करता गुप–चुप पणे निर्णय घेण्यात आला. **२००७ सालापासून** ही प्रक्रिया सुरू झाली. मात्र राज्यातील जनतेला **२००९ ला** समजले. विशेष म्हणजे काही मंत्र्यांनी या बाबत मंत्रीमंडळाच्या बैठकीत प्रश्न निर्माण केले तेव्हा जनतेला समजले की, मंत्रीमंडळातीलही सर्व मंत्र्यांना विश्वासात घेतले गेले नाही. जनतेच्या पैशावर सबसिडी देवून उभे करण्यात आलेले कारखाने व प्रत्येक लीटरमागे दहा रुपयांची दिली जाणारी सबसिडी राजकीय स्वार्थासाठीच असलेचे समजते. या कारखान्यांमधून निघणाऱ्या दारूपासून सामाजिक स्वास्थ्य बिघडणार असलेने शासनाने मान्यता दिलेले कारखाने आणि या कारखान्यांना जनतेच्या पैशातून कोट्यावधी रुपयांची दिली जाणारी सबसिडी बंद करण्यात यावी, दिलेली सबसिडी शासनाने परत घ्यावी, **यासाठी दि.१६ मार्च २०१० पासून सत्त्याग्रह सुरू करीत आहे.**

त्याचप्रमाणे राज्याची आर्थिक परिस्थिती बिकट असताना, महागाईमुळे सामान्य माणसांना आपलं जीवन जगणं अशक्य झालेलं असतांना मंत्री मंडळातील काही मंत्र्यांनी जनतेचा पैसा आवश्यक नसताना आपल्या दालना(केबीन)वर लाखों रूपये खर्च केला, तो पैसा जनतेचा असलेने ज्या मंत्र्यांनी आपल्या दालनांवर खर्च केला आहे तो पैसा त्यांच्याकडूनच वसूल करावा या मागणीसाठीही **दि.१६ मार्च २०१० पासून सत्त्याग्रह करीत आहे. राज्यातील जनतेलाही या सत्त्याग्रहामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करीत आहे.**

आपला,

कि. बा. हजारे (अण्णा)

**सदर पत्रकाच्या अनेक प्रती काढून जनजागरणाकरिता आपण प्रसिध्द कराव्यात**

मुद्रक व प्रकाशक : **भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास**, राळेगण सिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर ४१४ ३०२
☎ (०२४८८) २४०४०१, २४००१० Email : bvjralegan@gmail.com www.annahazare.org
मुद्रण स्थळ : प्रभात प्रिंटिंग वर्क्स, ४२७, गुलटेकडी, पुणे ३७